५०७

क्रमांक : मुंमप्रविप्रा/बैठक/५८

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे-कुर्ला समूह, प्लॉट क्र. सी-१४ व १५,
वांद्रे [पूर्व], मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : २१ ऑक्टोबर, १९९१

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ४ ऑक्टोबर, १९९१ रोजी झालेल्या ५८ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

२. सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत काही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्यात ही विनंती.

श्र. वि. आसगांवकर 21/10/91

[श्र. वि. आसगांवकर]
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,
सर्व सदस्य.

निमंत्रित :
शासनाचे सचिव [२]
नगर विकास विभाग
मंत्रालय,

प्रत अग्रेषित :
प्राधिकरणाचे अधिकारी
विधी सल्लागार

No.BMRDA/MTG/58.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Plot Nos.C-14 & C-15, 'E' Block,
Bandra-Kurla Complex,
Bandra(East), Bombay-400 051.

Date : 21st October, 1991.

The minutes of the 58th meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 4th October, 1991 are enclosed.

Members are requested kindly to intimate their objections, if any.

Asgaonkar 21/x/91.
(S. V. ASGAONKAR)
SECRETARY
EXECUTIVE COMMITTEE.

To:

All Members.

INVITEE

The Secretary (II) to the Government of Maharashtra, Urban Development Department, Mantralaya.

Copy to :

The Legal Adviser, B.M.R.D.A.

Officers of B.M.R.D.A.

ck,



# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या ५८व्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : ४ ऑक्टोबर, १९९१ [शुक्रवार]

वेळ : दुपारी ३-०० वाजता

स्थळ: समिती कक्ष [कक्ष क्र. ३१३]
माननीय नगर विकास मंत्र्यांचे कार्यालय,
३रा मजला, मंत्रालय.

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| श्री. सुशीलकुमार शिंदे<br>नगर विकास मंत्री | -- | अध्यक्ष |
| प्रा. जावेद खान,<br>गृहनिर्माण मंत्री | -- | सदस्य |
| श्री. रमेश दुबे<br>गृहनिर्माण राज्यमंत्री | -- | सदस्य |
| श्री. र. छो. अंकलेश्वरीया,<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| श्रीमती इंदूमती त्रि. पटेल,<br>नगरसेविका, बृहन्मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| श्री. भगवंतराव अ. पाटील,<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| श्री. प्रभाकर नारायण धारकर<br>विधान परिषद सदस्य | -- | सदस्य |
| श्री. के. पद्मनाभय्या<br>महानगरपालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| श्री. डी. टी. जोसेफ,<br>महाराष्ट्र शासनाचे सचिव [एक]<br>नगर विकास विभाग<br>आणि<br>महाराष्ट्र शासनाचे सचिव,<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | -- | सदस्य |
| श्री. आर. सी. सिन्हा,<br>व्यवस्थापकीय संचालक<br>सिडको. | -- | सदस्य |
| श्री. पी. सुब्रहमण्यम,<br>महानगर आयुक्त<br>मुं. म. प्र. वि. प्राधिकरण. | -- | सदस्य-सचिव |

प्रारंभी, अध्यक्षांनी माजी महापौर आणि प्राधिकरणाचे उपाध्यक्ष श्री. बाबुराव शेटे यांच्या निधनानिमित्त दुःखवटा व्यक्त केला. त्यानंतर प्राधिकरणाने एक मिनीट शांतता पाळून श्री. शेटे यांच्या निधनानिमित्त झालेल्या हानिबद्दल अतीव दुःख व्यक्त करणारा ठराव मंजूर केला. [परिशिष्ट]

बाब क्र. १ : प्राधिकरणाच्या मागील [५७व्या] बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे.

कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

बाब क्र. २ : वडाळा ट्रक टर्मिनल कार्यान्वयन तंत्र [अंमलबजावणी पध्दती]

२.१ परिच्छेद ४.२.५ मध्ये तपशिलवार दिल्याप्रमाणे प्राधिकरणाने जरी खाजगीकरणाच्या विकल्पाला तत्वत: आणि बाब टिप्पणीच्या परिच्छेद ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विक्री एजंट नियुक्त करण्याच्या प्रस्तावाला सहमती दर्शविली तरी "ट्रक टर्मिनलच्या उपयोगकर्त्यांशी सुसंगती ठेवून डेव्हलपर बांधीव जागेच्या ३० टक्के जागा वाणिज्य उपयोगकर्त्यांना विकू शकतील." या प्रस्तावावर बरीच चर्चा झाली.

२.२ चर्चेअंती असे आश्वासन देण्यात आले की, ३० टक्के ही बंधनकारक अट नाही. जर प्रत्यक्ष ट्रक टर्मिनलला अधिक जागा लागली- समजा सुमारे ८० टक्के, तरच फक्त २० टक्के जागा विकण्यास डेव्हलपरला अनुमती देता येईल. आणखी असे आश्वासन देण्यात आले की, ट्रक टर्मिनलच्या उपयोगकर्त्यांशी सुसुगत अशी वाणिज्य उपयोगकर्त्यांची यादी प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत ठेवण्यात येईल.

२.३ वरील स्पष्टीकरणाच्या अधीन राहून प्राधिकरणाने वर परि-२.१ मध्ये नमूद केलेले दोन्ही प्रस्ताव मंजूर केले आणि पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र. ४७७ :

असा ठराव करण्यात येत आहे की, बाब टिप्पणीच्या परिच्छेद ४.२.५मध्ये नमूद केल्यानुसार डेव्हलपरच्या मार्फत अनिक-वडाळा येथील ट्रक टर्मिनलच्या पहिल्या टप्प्यातील ४ इमारतींच्या बांधकामाच्या [म्हणजे सी-१, सी-२, डी-१ आणि इ-१] प्रस्तावाला प्राधिकरण, डेव्हलपरने विकण्याकरिता परवानगी द्यावयाच्या वाणिज्य जागेची टक्केवारी कमी होण्याच्या संबंधातील - म्हणजे प्रत्यक्ष ट्रक टर्मिनलशी संबंधीत उपयोगकर्त्यांना आवश्यक असलेल्या मोकळ्या जागेवर अवलंबून राहून ३० टक्क्यांपेक्षा कमी व तसेच ट्रक टर्मिनलशी संबंधित वाणिज्य उपयोगाची यादी स्वतंत्रपणे मंजूर करुन घेण्यात यावी या अटींच्या अधीन राहून, दुरुस्तीसह - प्राधिकरण याव्दारे तत्वत: मान्यता देत आहे.

"आम्ही ठरविण्यात येत आहे की, प्राधिकरण याद्वारे, ट्रक टर्मिनलच्या इमारत क्र. बी-१, बी-२, ए-१ व डी-२ मधील जागा बाब टिप्पणीच्या परिच्छेद ५ मध्ये नमूद केल्यानुसार मात्र लाभधारकांना विकण्याकरिता विक्री एजंट नेमण्यास, ट्रक टर्मिनल स्थावर मालमत्ता समिती, कार्यकारी समिती आणि महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र. ३ : ओशिवरे जिल्हा केंद्राच्या प्रारूप नियोजन प्रस्तावांस मंजुरी.

ओशिवरे जिल्हा केंद्रातील सार्वजनिक उपयुक्तता भू खंडांचा आणि इतर राखीव जागांच्या त्वरित विकासाकरिता विकास हक्काचे हस्तांतरण करण्यास परवानगी देण्याच्या सूचनेवर बरीच चर्चा झाली. ओशिवरे जिल्हा केंद्रातील सार्वजनिक उपयुक्तता भू खंडाचे बाबतीतील हस्तांतरणीय विकास हक्क देण्यास प्राधिकरणाने आपली मंजुरी दिली. तथापि, मुंबई विकास नियंत्रण नियम, १९९१ मधील तरतुदींचे पालन करून असे हस्तांतरणास विकास हक्क ओशिवरे जिल्हा केंद्राच्या अधिसूचीत क्षेत्राच्या बाहेरील क्षेत्रात उपयोगात आणावेत असे ठरविले. वाणिज्य विभागासाठी एकूण १.३३ [एकात्मिक] ऐवजी १.५ चटई क्षेत्र निर्देशांक असावा या अपवादासह प्रारूप नियोजन प्रस्तावांत प्रसिध्द केल्यानुसार विविध विभागांचे चटई क्षेत्र निर्देशांकही प्राधिकरणाने मान्य केले. उपरोल्लेखित दुरूस्त्यांसह बाब टिप्पणीत नमूद केलेल्या नियोजन प्रस्तावास प्राधिकरणाने मान्यता दिली आणि पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ४७८ :

" दि. २८ सप्टेंबर, १९८४ च्या ठराव क्र. २६५ च्या अनुषंगाने व १९६६ च्या महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या [संक्षिप्तात अधिनियम] २८ च्या उपकलम [३] अन्वये नेमलेल्या नियोजन समितीस प्राप्त झालेल्या हरकती वा सूचनांचा विचार करून सादर केलेल्या अहवालाचा विचार करून, अधिनियमाच्या कलम ४० च्या उपकलम [३] च्या खंड [ड] खाली प्रदान केलेल्या शक्तींचा आणि यासंबंधातील इतर सर्व शक्तींचा वापर करून असा ठराव करण्यात येत आहे की, बाब टिप्पणीत वर्णन केलेल्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. टीपीबी-४३८२/२६/युडी-५, दि. १८ जून, १९८२ च्या शासकीय अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या ओशिवरा जिल्हा केंद्र अधिसूचित क्षेत्रातील जमिनींच्या विकासाच्या नियोजन प्रस्तावांना,

बाब टिप्पणीत सुचविल्याप्रमाणे व वरील कार्यवृत्तामध्ये सुचविल्याप्रमाणे बदल करावेत या अटींसह उक्त ओशिवरा जिल्हा केंद्रात विकास हक्कांच्या हस्तांतरणाला प्राधिकरण मान्यता देत आहे आणि असे सुधारित नियोजन प्रस्ताव राज्य शासनाच्या मान्यतेकरिता सादर करावेत.

असेही ठरविण्यात येत आहे की, वाणिज्य [एकात्मिक] व [संक्रमण] परिमंडलामध्ये जमीन वापर तरतुदींचे योग्यरित्या समायोजन करून ओशिवरा जिल्हा केंद्राच्या विकास कामांकरिता तयार करावयाचे वास्तुरचनाविषयक नियंत्रण आरेखने मान्य करण्याकरिता प्राधिकरण याव्दारे, महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे.

"पुढे असेही ठरविण्यात येत आहे की, अंतिम सुधारीत नियोजन प्रस्ताव राज्य शासनाच्या मान्यतेकरिता सादर करण्यास प्राधिकरण याव्दारे महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे."

<u>बाब क्र.४ :</u> <u>माहीम निसर्ग उद्यान – बृहन्मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरण...</u>

प्राधिकरणाला कळविण्यात आले की, कार्यकारी समितीच्या मागील बैठकीनंतर "वर्ल्ड वाईड फंड फॉर नेचर-इंडिया" या संस्थेचे काही पदाधिकारी शासनाचे मुख्य सचिव व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या अध्यक्षांना भेटले आणि या पदाधिकाऱ्यांनी विनंती केल्यानुसार कार्यकारी समितीला त्यांनी उपस्थित केलेल्या कांही मुद्यांचा पुनर्विचार करण्यास कार्यकारी समितीला अवधी मिळावा म्हणून ही बाब पुढे ढकलण्यात आली.

नंतर अध्यक्षांच्या परवानगीने पुढील विषयावर पटल-बाब म्हणून विचार करण्यात आला.

<u>पटल बाब :</u> <u>वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "ज" ब्लॉकमध्ये मंजूर विकास योजनेत उद्यानासाठी राखून ठेवलेल्या १५,२८० चौ.मी. मोकळ्या जागेचा विनियोग...</u>

अतिरिक्त शर्ती म्हणून किंवा/आणि बाब टिप्पणीत आधीच सुचविलेल्या अटी व शर्तींमध्ये जे असेल त्याप्रमाणे खालील सुधारणा समवेत प्राधिकरणाने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला :-

[१] की, जलतरण तलावाच्या वापराचे शुल्क एका व्यक्तीमागे एक रुपयापेक्षा अधिक असता कामा नये.

513



[२] की, भाडेपट्टा अंतर्गत जमिनीवर आईस्क्रीम पार्लर, भेळपुरी स्टॉल इ. करिता परवानगी दिली जाणार नाही.

[३] की, भाडेपट्टा अंतर्गत जमिनीवर भाडेपट्टाधारकाच्या नावाखेरीज जाहिरात लावण्यास परवानगी दिली जाणार नाही.

[४] की, भाडेपट्टाधारकाला होणा-या आर्थिक नुकसानीचा भार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सोसणार नाही किंवा विभागून घेणार नाही.

[५] की, नफा असल्यास तो मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व भाडेपट्टाधारक ५०:५० या प्रमाणात विभागून घेतील. त्यासाठी भाडेपट्टाधारकाने ठेवलेल्या अभिलेख्यांची पहाणी महानगर आयुक्तांनी प्राधिकृत केलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिका-यांना करता येईल.

[६] की, उद्यानाच्या वापराकरिता बसवायचे सर्व शुल्काचे दर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून आधी मंजूर करून घ्यावे लागतील.

ठराव क्र.४७९ :

"असा ठराव करण्यात येत आहे की; प्रतिवर्षी रु.१ या नाममात्र दराने दहा वर्षाकरिता बाब टिप्पणीच्या परिच्छेद ४ मध्ये दिलेल्या अटी व शर्तींवर, इतर प्रमाणीभूत अटी व शर्ती व तसेच उपरोक्त कार्यवृत्तामध्ये आलेल्या अटी व शर्ती सापेक्ष वांद्रे-कुर्ला समूहाच्या "इ" ब्लॉकमधील निवासी भूखंड व विद्यालय भूखंडामधील १५,२८० चौ.मी. मोकळी जागा **कॉम्प्युटर मेन्टेनन्स कॉर्पोरेशनला** [सीएमसी] देण्यास, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ च्या उप-कलम [२] खालील शक्तींच्या आणि या संबंधातील इतर सर्व शक्तींचा वापर करून प्राधिकरण याव्दारे मान्यता देत आहे :

जमिनीचा तपशील :

१. मोकळी जागा : सीएमसी, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ आणि कामगार आयुक्त यांना अनुक्रमे दिलेल्या निवासी भूखंड, विद्यालय भूखंड आणि सी-१८, सी-१९ व सी-२० या भूखंडाच्या दक्षिणेकडील जागांच्या मध्ये असलेली मोकळी जमीन.

| | | |
|---|---|---|
| २. मोकळी जागा ज्यांना दिली आहे त्या संघटनेचे नाव | : | **मे. कॉम्प्युटर मेन्टेनन्स कॉर्पोरेशन** [सीएमसी] |
| ३. भाडेपट्टा दर | : | प्रतिवर्षी एक रुपया |
| ४. भाडेपट्टा अवधी | : | १० [दहा] वर्षे. |

"असे ठरविण्यात येत आहे की, या संबंधात आवश्यक पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

"असेही ठरविण्यात येत आहे की, भाडेपट्टाधारकाशी करावयाच्या भाडेपट्टा करार व भाडेपट्टा विलेखाच्या नमुन्यात, आवश्यक असल्यास, योग्य बदल करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर अध्यक्षांचे आभार मानून बैठक संपली.

---

परिशिष्ट

परिशिष्ट

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची
५८ वी बैठक

दिनांक : ४ ऑक्टोबर, १९९१.

: ठ रा व :

"मुंबईचे माजी महापौर आणि प्राधिकरणाचे दि. ४ एप्रिल, १९८० ते दि. ३१ मार्च, १९८१ या कालावधीतील उपाध्यक्ष श्री. बाबुराव शेटे यांच्या दि. १९ सप्टेंबर, १९९१ रोजी दु:खद निधन झाले. त्यामुळे झालेल्या हानीची नोंद, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, अतीव दु:खाने घेत आहे.

"श्री. बाबुराव शेटे हे दि. ७ एप्रिल, १९७८ ते ३१ मार्च, १९८१ पर्यन्त प्राधिकरणाचे सदस्य होते. तसेच दि. २६ जून, १९७९ ते ३१ मार्च १९८१ पर्यन्त मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या पूर्वीच्या स्थायी समितीचे सदस्य होते.

"प्राधिकरणाला त्यांच्या व्यापक आणि विविध अनुभवांचा बहुमोल लाभ झाला."

---

# MINUTES OF THE 58TH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 4th October, 1991 (Friday)

TIME : 3.00 P.M.

PLACE : Committee Room (Room No.313) in the office of the Hon'ble Minister for Urban Development, 3rd Floor, Mantralaya.

MEMBERS PRESENT :

| | |
|---|---|
| Shri Sushilkumar S. Shinde, Minister for Urban Development. | - Chairman |
| Prof. Javed Khan, Minister for Housing. | - Member |
| Shri Ramesh Dube, Minister of State for Housing. | - Member |
| Shri R.C. Ankleswaria, Councillor, B.M.C. | - Member |
| Smt. Indumati T. Patel, Councillor, B.M.C. | - Member |
| Shri Bhagwantrao A. Patil, Councillor, B.M.C. | - Member |
| Shri Prabhakar Narayan Dharkar, M.L.C. | - Member |
| Shri K. Padmanabhaiah, Municipal Commissioner, B.M.C. | - Member |
| Shri D.T. Joseph, Secretary (I) to the Government of Maharashtra, Urban Development Department. & | - Member |
| Secretary to the Government of Maharashtra, Housing & Special Assistance Department. | - Member |
| Shri R.C. Sinha, Managing Director, CIDCO. | - Member |
| Shri P. Subrahmanyam, Metropolitan Commissioner, BMRDA. | - Member-Secretary |

At the outset, the Chairman condoled the sad demise of Shri Baburao Shete, ex-Mayor of Bombay and Vice-Chairman of the Authority. The Authority then passed a Resolution placing on record its deep sense of loss at the passing away of Shri Shete by observing one minute's silence. (Annexure).

ITEM NO. 1 : Confirmation of the minutes of the last (57th) meeting of the Authority.

The minutes were confirmed.

ITEM NO. 2 : ....

ITEM NO.2 : Wadala Truck Terminal - Implementation Strategy -

2.1. Even-though the Authority agreed in principle to the option for privatisation as detailed in para.4.2.5 and also the proposal to appoint Sales Agents as mentioned in para.5 of the item note, there was a considerable discussion on the proposal - viz. "30% of the built-up space could be sold by the developer to commercial users consistent with the user of the Truck Terminal."

2.2. At the end of the discussion, it was assured that 30% was not an obligatory condition. If the Truck Terminal proper required more space - say about 80%, then only 20% space could be allowed to be sold by the developer to others. It was further assured that a list of commercial users consistent with the user of the Truck Terminal would be placed before the Authority at its next meeting.

2.3. Subject to the above clarification, the Authority passed both the proposals mentioned in para.2.1 above and passed the following Resolution :

RESOLUTION NO 477 :

"RESOLVED THAT the Authority hereby approves in principle the proposal to construct 4 buildings - (viz. C-1, C-2, D-1 and E-1) in the first phase of the Truck Terminal at Anik-Wadala through the developer as mentioned in para. 4.2.5 of the item note with the modification that the stipulation regarding percentage of commercial space to be allowed to be sold by the developer being varied downward - i.e. less than 30% depending upon the space required for users consistent with the Truck Terminal proper and further subject to the list of commercial users consistent with Truck Terminal being got approved from the Authority.

"RESOLVED FURTHER THAT the Authority hereby authorises the Truck Terminal Immovable Property Committee - (TTIPC), the Executive Committee and the Metropolitan Commissioner to appoint Sales Agents for marketing the space in buildings B-1, B-2, A-1 and D-2 of the Truck Terminal to the eligible beneficiaries as mentioned in para.5 of the Item Note."

ITEM NO.3 : ....

519



ITEM No.3: Approval of Draft Planning Proposals of Oshiware District Centre -

There was considerable discussion on the suggestion to allow Transfer of Development Rights - (TDR) for expeditious development of public utility plots and other reservations in the Oshiware District Centre. The Authority approved that the TDR facility as permissible under Bombay Development Control Regulations, 1991 will be made available on public reservations in Oshiware District Centre. However, the said TDR will have to be used outside the notified area of Oshiware District Centre as per Bombay Development Control Regulations, 1991. The Authority also approved the FSI for various zones as published in the draft planning proposals with the exception that the F.S.I. for commercial (integrated) zone shall be 1.5 instread of 1.33 gross. The Authority approved the planning proposals with modification as mentioned above and passed the following Resolution :-

RESOLUTION NO. 478 :

" RESOLVED in continuation of Resolution No.265 dated 28th September, 1984 that the Metropolitan Authority having considered the report of the Planning Committee presented under sub-section (3) of Section 28 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966, ("the Act", for brevity) and the objections and suggestions received by the Planning Committee, do in excercise of its powers under Clause (d) of sub-section (3) of Section 40 of the Act, and all other powers enabling it in this behalf approve of the Planning Proposals as described in the Agenda Note for the development of lands distuate in Oshiware District Centre Notified Area specified in Government Notification, Urban Development & Public Health Department No. TPB/4382/26/ UD-5, dated 18th June, 1982, subject to the modifications contained in the minut-es and the planning proposal so modified be submitted to the State Government for approval.

" RESOLVED FURTHER THAT the Authority hereby authorises the Metropolitan Commissioner to approve the

architectural....

architectural control drawings as may be prepared for the developments of Oshiware District Centre by suitably adjusting the use provisions in the commercial (integrated) & (transformation) zone.

"RESOLVED FURTHER THAT the Authority hereby authorises the Metropolitan Commissioner to submit the final modified Planning Proposals for State Government's approval."

**ITEM NO.4 : Mahim Nature Park - Handing over to M.C.G.B.**

The Authority was informed that after the last meeting of the Executive Committee, some of the office bearers of the World Wild Life Fund For Nature - India met the Chief Secretary & Chairman, Executive Committee, BMRDA, and that as requested by these office bearers, the Executive Committee might like to reconsider the issues posed by them. Consideration of the Item was, therefore, deferred for giving the Executive Committee time for reconsideration, if any, of the issues posed by the World Wild Life Fund.

The following item was then considered as Table Item with the permission of the Chair :

**TABLE ITEM : Disposal of open space admeasuring 15,280 sq.mtrs. reserved for the Garden in the sanctioned Development Plan in 'E' Block, Bandra-Kurla Complex.**

The Authority approved the proposal contained in the Item note with the following modifications being made in the terms and conditions already suggested in the Item Note and/or as additional conditions, as the case may be :-

(1) That the lessee shall not charge more than Rupee 1 per person for use of Swimming Pool;

(2) That no Ice-cream Parlour, Bhelpuri Stall, etc. be allowed inside the leased land;

(3) That no advertisement except the name of the lesee shall be allowed in the leased land;

(4) That the BMRDA will not bear or share any financial loss suffered by the lessee;

(5) That the lessee shall share profits, if any, in the proportion of 50:50 with the BMRDA and the BMRDA officers authorised by the Metropolitan Commissioner shall have access to inspect the record maintained by the lessee.

(6) That ....

(6) That all the tariffs to be imposed for the use of Park shall have previous approval of the BMRDA.

The Authority accordingly passed the following Resolution :

RESOLUTION NO.479 :

"RESOLVED THAT in exercise of the powers conferred on it under sub-section (2) of Section 3 of the BMRDA Act, 1974, and all other powers enabling it in this behalf, the Authority hereby approves the proposal to allot the open space admeasuring 15,280 sq.mtrs. between the residential plot and the school plot, in 'E' Block of the Bandra-Kurla Complex to the Computer Maintenance Corporation of India Ltd. - (CMC) on a nominal rental of Re.1/- per year, on a lease of ten years, on the terms and the conditions listed in para.4 of the item note, other standard terms and conditions **and also subject** to the conditions mentioned in the minutes.

Details of Land :

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Open Space | : | Open Space lying between Residential Plot and School Plot and to the south of the Plot Nos.C-18, C-19 & C-20 allotted to the CMC, MSEB & Commissioner of Labour respectively. |
| 2. | Name of the Organisation to which the open space allotted. | : | M/s. CMC Ltd. |
| 3. | Lease Rent | : | One Rupee per annum. |
| 4. | Lease Period. | : | 10 (Ten) years. |

"RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to take further necessary action in this regard.

"RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to make suitable amendments, if necessary, in the form of Agreement to Lease and Lease Deed, to be executed with the allottee."

The Meeting then terminated with vote of thanks to the Chair.

-.-.-.-.-.-.-.-.-.-

ANNEXURE

## FIFTY-EIGHTH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 4th OCTOBER, 1991.

## RESOLUTION

" The Bombay Metropolitan Region Development Authority places on record its deep sense of loss at the sad passing away on 19th September, 1991 of Shri Baburao Shete, Ex-Mayor of Bombay and Vice-Chairman of the Authority during the period from 4th April, 1980 to 31st March, 1981.

" Shri Baburao Shete was a Member of the Authority from 7th April, 1978 to 31st March, 1981 and also Member of erstwhile Standing Committee of Bombay Metropolitan Region Development Authority from 26th June, 1979 to 31st March, 1981.

" This Authority benefited considerably from his vast and varied experience."

---------